जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४८ दिनांक - १५/०७/२०२३**

युनिट-३ गुन्हे शाखा,पुणे शहर

## पुणे शहर परीसात अट्टल घरफोडी करणारा अभिलेखावरील गुन्हेगार अखेर गुन्हे शाखा, युनिट-३,च्या जाळयात

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर, मा.पोलीस सह आयुक्त व अपर पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे शहर यांनी पुणे शहरातील गुन्हेगारी नष्ट व्हावी.व गुन्हयांना प्रतिबंध व्हावा याकरीता पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार,यांना चेक करुन त्यांचे विरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत आदेशीत केले होते.

वरिष्ठांचे आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री श्रीहरी बहिरट यांचे मार्गदर्शनाखाली वारजे माळवाडी पोलीस स्टेशन हद्दीत रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करण्याची मोहिम हाती घेवुन,गुन्हेगार चेक करित असताना गुन्हे शाखा, युनिट ३,पुणे शहर येथे नेमणुकीस असलेले **पो.हवा २५३६ राजेन्द्र मारणे व पो.ना ७०२५ संजीव कळबे** यांना मिळालेल्या गोपनीय बातमीवरुन नुकताच तडीपार मधुन मुक्त झालेला अट्टल घरफोडी करणारा रेकॉर्डवरील आरोपी नामे रोहित वसंत पासलकर वय ३२ वर्षे, रा.फ्लॅट नंबर ३०८,परिजात हाईटस,जाधव नगर,रायकर मळा,धायरी,पुणे हा चोरलेल्या पैशांची उधळपट्टी करित आहे. तसेच याने वारजे माळवाडी परीसरात घरफोडी केली_असुन हा चैतन्य चौक,वारजे माळवाडी,पुणे येथे येणार आहे.असी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यास तेथुन ताब्यात घेतले.त्याचे कब्जात दोन व्हिवो कंपनीचे व एक टेक्नो स्पार्क कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट असे तीन मोबाईल हॅन्डसेट घरफोडी चोरी केलेला माल मिळुन आल्याने त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याने खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे कबुली दिली.

१) वारजे माळवाडी पो.स्टे गु.र.नं २९८/२०२३ भादवि कलम ३८०, ४५७
२) वारजे माळवाडी पो.स्टे गु.र.नं २७३ /२०२३ भादवि कलम ३८०,४५४ ,४५७
३) वारजे माळवाडी पो.स्टे गु.र.नं २६२/२०२३, भा.द.वि.क. ४५४, ४५७, ३८० प्रमाणे.
४) वारजे माळवाडी पो.स्टे गु.र.नं २७/२०२३ भा.द.वि. कलम ३८०,४५४,४५७
५) वारजे माळवाडी पो.स्टे गु.र.नं १९३/२०२३, भा. द. वि. कलम ४५७,३८०

असे एकुण घरफोडीचे ०५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.त्याचेकडुन एकुण २,००,०००/- रुपये किंमतीचा घरफोडी केलेला मुद्देमाल त्यामध्ये सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल हॅन्डसेट असा माल हस्तगत करण्यात आला.

सदर आरोपी हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द घरफोडी चोरी,जबरीचोरी, दुखापत यासारखे २० पेक्षा जास्त गुन्हयांची नोंद आहे.

सदरची कामगिरी ही, मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे १ श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीहरी बहिरट,पोलीस उप-निरीक्षक अजितकुमार पाटील,पोलीस उप-निरीक्षक राहुल पवार,सहा.पो.फौ.संतोष क्षिरसागर,पोलीस अंमलदार राजेंद्र मारणे,शरद वाकसे,किरण पवार,सुरेंद्र साबळे,संजिव कळंबे,ज्ञानेश्वर चित्ते,सतिश कत्राळे,प्रताप पडवाळ,प्रकाश कट्टे,साईनाथ पाटील, साईकुमार कारके,सोनम नेवसे,भाग्यश्री वाघमारे यांचे पथकाने केली आहे.